# राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान

## ❖ अभियानाची उद्दिष्टये :-

१. नागरी गरीब लोक, नागरी गरीब लोक, त्यांच्या संस्थांची क्षमता बांधणी करणे, उपजीविकेचा विकास व नागरी दारिद्रय निर्मुलन करणारी यंत्रणा यांची क्षमता वाढविणे.

२. नागरी गरीब कुंटूंबातील व्यक्तींना उपजीविकेच्या जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून देणे,

३. बाजाराच्या औद्योगिक गरजेनुसार व आवश्यकतेनुसार, विविध क्षेत्रांच्या गरजा लक्षात घेऊन नागरी गरीब व्यक्तींना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार व स्वंयरोजगाराची संधी उपलब्ध करून देणे.

४. नागरी गरिबांच्या लघूउद्योगांना चालना देणे.

५. नागरी बेघर लोकांसाठी कायमस्वरूपी व मुलभूत सोयी सुविधा असलेल्या निवाऱ्याची सोय करणे.

६. नागरी फेरीवाल्यांच्या उपजीविकेच्या समस्या सोडवून त्यांचा दर्जा उंचावण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे.

## ❖ अभियानाची उपांगे :-

- सामाजिक अभियानाची अभिसरण व संस्थात्मक बांधणी. (Social Mobilization and Institional Placement)
- कौशल्य प्रशिक्षणाव्दारे रोजगाराची उपलब्धता. (Empoloyment Through skill Traning & Placement)
- क्षमत बांधणी व प्रशिक्षण. (Capacity Building and Training)
- स्वंयरोजगार कार्यक्रम. (Self Empoloyment Programme)
- फेरीवाल्यांना सहाय्य. (Support to Urban Street Vendors)
- शहरी बैघरांसाठी निवारा. (Scheme of Shelter for Urban Homeless)

- **सामाजिक अभियानाची अभिसरण व संस्थात्मक बांधणी :-**

**अ) प्रथम स्तर :- स्वंय सहाय गट (Self Help Group) -**

**शहरी** गरीबांचे राहणीमान उंचावण्याच्या दृष्टीने 10 ते 20 महिला किंवा पुरूष एकत्र येऊन सदर गट स्थापन करतील. सदर गट बँकेकडून कर्ज व बचतीच्या माध्यमातून एकत्रित निधी उभा करून गटांच्या सदस्यांना गरजेनुसार अल्प मुदतीची कर्जे उपलब्ध करतील. सदरहू गट नोंदणीकृत असणे आवश्यक राहणार नाही. अभियाना अंतर्गत सर्वसाधारणत: प्रथम, महिला सभासदांचे स्वंयसहाय्य गट स्थापन करणे आवश्यक राहिल. तथापि आवश्यकतेनुसार विकलांग पुरषांचे गट दखील स्थापन करता येथील.

**ब) व्दितीय स्तर :- वस्ती स्तर संघ (Area Level Federation) -**

प्रभागातील अथवा वॉर्ड स्तरावरील स्थापीत सर्व स्वंयसहायय समूह संघ एकत्र येऊन त्यांचे "वस्ती स्तर संघ" स्थापीत केले जाईल. 10 ते 20 स्वंयसहाय्य गटांचे मिळून एक "वस्ती स्तर संघ" स्थापीत होईल.

**क) तृतीय स्तर :- शहर स्तरावरील समूह (City Level Federation) -**

अभियाना अंतर्गत समावेश असलेल्या शहर स्तरावरील सर्व "वस्ती स्तर संघ" एकत्रित येऊन "शहर स्तरावरील समूह" स्थापन केले जाईल. प्रत्येक शहरात किमान एक शहर स्तरावरील समूह

असणे आवश्यक राहील. सदर शहर स्तरावरील समूह प्रचलित नियमानुसार नोंदणीकृत राहील.

- **सर्वसमावेशक वित्तीय समावेशन (Universal Financial inclusion)**
- **शहरी उपजीविका केंद्र (City Livelihood Center)**

❖ **कौशल्य प्रशिक्षणाव्दारे रोजगाराची उपलब्धता. [ Empoloyment Through skill Traning & Placement) (EST & P) ]**

अभियानाअंतर्गत शहरी गरीब व्यक्तींना कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन रोजगाराची संधी उपलब्ध करण्याकरीता आवश्यक ती उपायोजना सदरहून घटकामार्फत केली जाईल. त्या अनुषंगाने संबसंधित लाभार्थ्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करण्याकरीता बाजारातील कौशल्याच्या गरजेनुसार आवश्यक कौशल्य विकासाचे प्रशिक्षण दिले जाईल. कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देतांना सदरहू प्रशिक्षण "राष्ट्रीय व्यवसायिक शिक्षण पात्रता आराखडा" (National Vocational Educational Qualification framework) NVEQF) च्या आधारे असणे आवयक राहिल. सर्व प्रशिक्षण मॉडयुल्स "उद्योग आधारीत" (Indusry Based) असणे आवश्यक राहिल, जेणेकरून लाभार्थ्यांना रोजगाराच्या संधी सहजरित्या उपलब्ध होतील.

❖ स्वंयरोजगार कार्यक्रम [Self Employment Programme (SEP)] :-

अभियानाअंतर्गत आवश्यक ते कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देऊन बाजाराच्या गरजेनुसार शहरी गरीबांना त्यांच्या जीवनमानाचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी उद्योग व्यवसाय, लघु व्यवसायाच्या माध्यमातून स्वंयरोजगार सुरू करण्यासाठी आवश्यक ते सहाय्य या

घटकाव्दारे देण्यात येईल. त्या अनुषंगाने स्वंयरोजगार कार्यक्रमातंर्गत खालील नमूद  बाबींवर भर देण्यात येईल :-

१) उमेदवारांची क्षमता, कौशल्य, आवड व कल इत्यादी लक्षात घेवून व्यवसायाची निवड करण्यासाठी मार्गदर्शनपार सहाय्य करण्यात येईल.

२) या घटकातंर्गत वैयक्तिकरीत्या किंवा व्यवसाय सुरू करण्यासाठी कर्ज रूपाने भांडवल उपलब्ध करून देण्यात येईल.